## सांगवी, कोऱ्हाळे येथे आज दूध दरप्रश्नी आंदोलन

**माळेगाव, जि. पुणे (सकाळ वृत्तसेवा) :** बारामती तालुक्यात दूध आंदोलन अधिक तीव्र करण्याच्या उद्देशाने आज (गुरुवारी, ता. १९) जनावरांसह शेतकरी रस्त्यावर उतरणार आहेत. तालुक्यातील सांगवी, कोऱ्हाळे (कटीन पूल) येथील राज्य मार्गावर दूध दरप्रश्नी आंदोलन होणार असून, शेतकऱ्यांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र ढवाण यांनी दिली.

राज्यात दूध दरवाढीच्या आंदोलनाला निर्णायक वळण देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व खासदार राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांना जनावरांसह रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या भूमिकेला पाठिंबा देण्याच्या उद्देशाने विशेषतः बारामती तालुक्यात सांगवी, कोऱ्हाळे आदी भागात आंदोलन करण्याची तयारी झाली आहे. या अगोदर स्वाभिमानी संघटनेच्या कार्यकर्ते विलास सस्ते, महेंद्र तावरे, तात्या जगताप, करण आटोळे आदींनी लोकांना मोफत दुधाचे वाटप करून शासनाचा निषेध केला.

# जिल्ह्यातील धरणांमध्ये १०६ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा

**पुणे (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील पश्चिम भागात असलेल्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने दमदार हजेरी लावल्याने धरणांतील पाणीसाठ्यात वेगाने वाढ होत आहे. जिल्ह्यातील धरणांची एकूण क्षमता २१६.८४ टीएमसी असून, बुधवारी (ता.१८) सकाळी आठ वाजेपर्यंत उजनीसह जिल्ह्यातील २५ धरणांमध्ये मिळून सुमारे १०६ टीएमसी (सुमारे ४९ टक्के) उपयुक्त पाणीसाठा झाला होता.

धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे ओढ, नाले, नद्यांना दुथडी भरून वाहत असल्याने वडज, कळमोडी, वडीवळे, खडकवासला, गुंजवणी धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. जिल्ह्यातील बहुतांशी धरणे निम्म्याहून अधिक भरली असून, कळमोडी व खडकवासला धरण पूर्णपणे भरले आहे. चासकमान, आंद्रा, कासारसाई, पानशेत धरणांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक पाणीसाठा झाला आहे. पिंपळगाव जोगे आणि घोड धरणामध्ये पाणीपातळी अद्यापही अचल साठ्यात आहे. नाझरे धरणातही अत्यल्प पाणीसाठा असल्याचे पुणे पाटबंधारे विभागातर्फे सांगण्यात आले



**पुणे : गुंजवणी (ता. वेल्हे) धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या जोरदार पावसामुळे धरणातून २७७६ क्युसेक वेगाने विसर्ग करण्यात येत आहे.**

**जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा (टीएमसी) कंसात टक्केवारी :** टेमघर २.१७ (५९), वरसगाव ७.४०(५८), पानशेत ९.१८ (८६), खडकवासला १.९७ (१००), वडीवळे ०.८१ (७५), आंद्रा २.५९ (८९), पवना ६.७६ (७९), कासारसाई ०.४७ (८४), मुळशी १३.९० (७५), कळमोडी १.५१ (१००), चासकमान ६.३८ (८४), भामा आसखेड ५.२२ (६८), भाटघर १४.७७ (६३), नीरा देवघर ७.०० (६०), गुंजवणी २.३७ (६४), वीर ७.०२ (७५), नाझरे ०.०१ (२), माणिकडोह ३.२२ (३२), १.५६ (५६), वडज ०.५६ (४८), डिंभे ७.८८ (६३).

### ‘उजनी’चा पाणीसाठा उपयुक्त पातळीत

**जिल्ह्यातील सर्वात मोठे धरण असलेल्या उजनी धरणाचा पाणीसाठा अचल पातळीतून उपयुक्त पातळीत आला आहे. बुधवारी सकाळी आठ वाजेपर्यंत उजनी धरणामध्ये ३.३५ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा होता. अचल पातळीतील पाणीसाठ्याचा विचार करता उजनी धरणात ६७ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. जिल्ह्यातील नद्या दुथडी भरून वाहत असल्याने उजनीतील पाणीसाठ्यात वाढ होत आहे.**

## कुसवली येथील शेतकऱ्यांचे नुकसान

**टाकवे बुद्रुक, जि. पुणे :** कुसवली येथील शेतकऱ्यांच्या भात खाचरात खराळ वाहून आल्याने नुकसान झाले आहे, या नुकसानीची भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. डोंगरपठारावर उन्हाळ्यात वन विभागाने पाणी साठवण करण्यासाठी शेततळी खोदली होती, ही शेततळी फुटून मुरूम, माती ओढ्यातून वाहत खाली आली, त्यामुळे येथे बांधलेला बंधारादेखील तुटला. यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कुसवलीतील शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी कृषी अधिकारी व गावकामगार तलाठी यांनी केली. सर्व शेतकरी मावळचे तहसीलदार रणजित देसाई यांना नुकसानभरपाई मिळावी, यासाठी भेटून निवेदन देणार आहे.



**अकलूज, जि. सोलापूर : संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील भव्य असे गोल रिंगण सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडले.**

सकाळ अॅग्रोवन
आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित
सकाळ अॅग्रोवन संवाद
‘अॅग्रोवन’ साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
शुक्रवार, २० जुलै २०१८
पुणे
विषय - ऊस व्यवस्थापन तंत्रज्ञान
वक्ते - डॉ. एस. के. घोडके
(मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, नीरा पाडेगाव)
स्थळ - श्री काळभैरवनाथ मंदिर, यवत, ता दौंड, पुणे
वेळ - सकाळी ९ वा.
अहमदनगर
विषय - ऊस उत्पादन वाढ तंत्रज्ञान
श्री. सचिन बडधे (विषय विशेषज्ञ, केव्हीके, दहिगाव-ने)
स्थळ - गंगामंदिर, मु. पो. प्रवरासंगम,
ता. नेवासा, जि. अहमदनगर, वेळ - सकाळी ८.३० वा.
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# पुणे जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरला

**पुणे (प्रतिनिधी) :** जिल्ह्यात गेले दोन दिवस सुरू असलेल्या पावसाचा जोर बुधवारी (ता. १८) ओसरला होता. जिल्ह्यात अनेक ठिकाणी ऊन-सावल्यांच्या खेळात पावसाची रिमझिम सुरू होती. पश्चिम भागातील तालुक्यांमध्ये सरीमागून सरी येत होत्या. पूर्व भागातील तालुक्यांमध्ये पावसाची मात्र उघडीप होती.

मावळ पट्ट्यात सुरू असलेल्या पावसाने भातखाचरे ओसंडून वाहत आहेत. अनेक ठिकाणी भात लागवडीची कामे वेगाने सुरू आहेत. लागवड झालेला भात वाढीच्या अवस्थतेत आहे. दोन दिवस पावसाने जोरदार हजेरी लावली होती. दुष्काळी पट्ट्यातही हलका ते मध्यम पाऊस पडल्याने खरीप पिकांना जीवदान मिळाले. मात्र बुधवारी पावसाने पुन्हा उघडीप दिली आहे. बुधवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये मुळशी, मावळ, भोर, जुन्नर तालुक्यांच्या पश्चिम भागात पावसाचा जोर चांगला होता. मावळ तालुक्यातील लोणावळा, कार्ला, भोर मधील भोलावडे, मुळशीतील मुठे यासह काही ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाल्याचे कृषी विभागातर्फे सांगण्यात आले.

बुधवारी (ता. १८) सकाळी आठ वाजेपर्यंतच्या २४ तासांमध्ये जिल्ह्यात विविध ठिकाणी पडलेला पाऊस (मिमी) : घोटावडे ४०, माले ६४, मुठे ११४, भोलावडे १३०, आंबवडे ५४, निगुडघर ६१, काले ८६, कार्ला ११८, खडकाळा ७६, लोणावळा १३४, वेल्हा ५२, पानशेत ५२, राजूर ८५, ओतूर ४२, कुडे ५०.

## पावसामुळे फुलशेतीचे नुकसान

**सोमाटणे, जि. पुणे :** पावसामुळे फुलांची तोड थांबल्याने पवन मावळातील फुलशेतीचे मोठे नुकसान झाले.

पावसाळी हंगामात फुलांना चांगले बाजारभाव मिळत असल्याने गहुंजे, शिरगाव, सोमाटणे, सांगवडे, कुसगाव परिसरातील शेतकऱ्यांनी या वर्षी फुलशेतीचे क्षेत्र वाढवले होते. जून महिन्यात बाजारभाव चांगले असल्याने फुलशेतीपासून शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळाले होते. परंतु जुलै महिन्यात मागणी घटली होती. त्यातच गेले आठ दिवस होत असलेल्या पावसामुळे फुले भिजून खराब झाली. पावसामुळे शेतकऱ्यांना फुलांची तोडणी करता आली नाही. अनेक शेतकऱ्यांकडील फुले वाया गेली. फुलांना बाजार नसल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही भागला नाही.